राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी व अराजपत्रित
कर्मचाऱ्यांसाठी मराठीच्या परीक्षा :
उमेदवारांची मातृभाषा ठरविण्याबाबत.

शासकीय परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मभाप-१५७७/म, दिनांक २५ फेब्रुवारी १९७५ मध्ये कर्मचाऱ्यांची मातृभाषा ठरविणारे निकष घोषित केलेले आहेत यावाबत आणखी खुलासा या परिपत्रकाद्वारे करण्यात येत आहे.

२. मराठी भाषा परीक्षेमध्ये सूट देण्यामागील हेतू त्यांना शासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्याचे मराठीचे पुरेसे ज्ञान आहे की नाही हे ठरविणे हा आहे. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची मातृभाषा मराठी आहे परंतु त्यांचे शिक्षण मराठीतून झालेले नाही अथवा ज्यांनी शालांत किंवा उच्चस्तर परीक्षेसाठी मराठी हा विषय घेतलेला नाही, अशांच्या बाबतीत त्यांच्या मराठीच्या ज्ञानाबद्दल कोणता पुरावा ग्राह्य मानावा हे ठरविताना किंवा एखादा अधिकारी/कर्मचारी आपली मातृभाषा मराठी आहे असा दावा करून मराठी भाषा परीक्षेतून सूट मिळण्याची मागणी करीत असेल तर, त्यावेळी त्याने पुढील गोष्टींची पूर्तता केली पाहिजे :—

(अ) त्यास देवनागरी लिपी अवगत असली पाहिजे.

(ब) त्यास शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्याइतके मराठीचे पुरेसे ज्ञान आहे अशी खात्री करून घेतल्याबद्दल कार्यालय प्रमुखाचे/विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र त्याने सादर केले पाहिजे.

३. असाच प्रश्न, ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची मातृभाषा मराठी नाही परंतु ज्यांनी मराठी माध्यमातून शिक्षण घेतले आहे, परंतु शालांत परीक्षेसाठी किंवा उच्चस्तर परीक्षेसाठी मराठी हा विषय घेतलेला नाही, त्यांच्याही बाबतीत उपस्थित होण्याची शक्यता आहे. असे अधिकारी/कर्मचारी मातृभाषेऐवजी त्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले असल्याने त्यांना शासकीय कामकाज मराठीतून चांगल्या प्रकारे करता येते, असा दावा करून मराठी भाषा परीक्षेमध्ये सूट मिळण्याची मागणी करतील तर, त्यांना अशी सूट देण्यापूर्वी त्यांनी पुढील गोष्टींची पूर्तता केली पाहिजे :—

(अ) त्यांना देवनागरी लिपी अवगत असली पाहिजे.

(ब) त्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले आहे असे संबंधित शिक्षण संस्थेने दिलेले प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.

(क) त्यांना शासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्याइतके मराठीचे पुरेसे ज्ञान आहे अशी खात्री करून घेतल्याबद्दलचे कार्यालय प्रमुखाचे/विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र त्याने सादर केले पाहिजे.

(परिपत्रक क्रमांक मभाप-१५७७/२८, दिनांक १० फेब्रुवारी १९७८)